# विश्वबंधुत्व

सत्यान्नास्ति परोधर्मः

## मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनचे द्वैमासिक

एप्रिल – मे २०२०

# मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन

प्रकाशक
अध्यक्ष
मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन

वर्ष २०२० एप्रिल – मे २०२० अंक ४

## अनुक्रमणिका



| अ.क्र. | शीर्षक / लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | संपादकीय<br>बंधु (ॲड.) संजय दि. पोटे | ३ |
| २. | जे. कृष्णमूर्ती, थिऑसॉफी आणि थिऑसॉफिकल सोसायटी<br>अनुवाद – बंधु डॉ. विनायक मिराशी | ५ |
| ३. | मानवतेच्या सेवकांचा समूह (Band of Servers)<br>ले. – भगिनी सुमतीताई कुलकर्णी, पूना लॉज | १० |
| ४. | थिऑसॉफिस्टची कर्तव्ये | १३ |
| ५. | दामोदर आणि थिऑसॉफिकल चळवळ<br>प्रेषक – बंधु नितीन अभ्यंकर, पुणे. | १४ |
| ६. | लॉज वार्ता | २८ |



**या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मतांशी संपादक मंडळ आणि मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन सहमत असेलच असे नाही.**

**वार्षिक वर्गणी : रु. १००/–**

**(आजीव सदस्य – १५ वर्षे – रु. १०००/–)**

# संपादकीय

मागील काही आठवड्यांपासून संपूर्ण जग एका विषाणूच्या संसर्गाने क्षतिग्रस्त झाले आहे. विकसनशील देशांमधेच नव्हे तर विकसित देशांमधे देखील शेकडो, हजारो लोक मृत्युमुखी पडले आहेत. मृतात्म्यांना श्रद्धांजली.

तातडीची आणि महत्वाची खबरदारी म्हणून आपल्या देशात 'लॉकडाऊन' करण्यात आहे. ह्याच अनुषंगाने थिऑसॉफिकल सोसायटीने देखील काही काळासाठी थिऑसॉफी विषयांवरील सभा, चर्चासत्रे, अभ्यासवर्ग, मेळावे व सर्व सामुहिक कार्यक्रम न घेण्याचे ठरवले. फेडरेशनने देखील तशा सूचना लॉजेस् व सेंटर्सना दिल्या आहेत.

अशा बिकट काळात जनसामान्यांमधील एकीचे, सौदार्ह्याचे, दानशूरतेचे, सहकार्याचे अनेक प्रसंग बघावयास व वाचावयास मिळाले. कौटुंबिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता, प्रदूषण नियंत्रण इ. अनेक सकारात्मक बाबी समोर आल्या आहेत. बहुसंख्य व्यक्तींमधे श्रद्धा, संयम व त्याग ह्या मानवी गुणांना बळ मिळाले. काही का असेना, सर्व संकटांवर मात करीत आपणा सर्वांना उत्क्रांतीच्या सार्गावर पुढे जायचे आहे.

या काळातही थिऑसॉफीशी संबंधित विचारांची व लिखाणाची देवाणघेवाण ई-माध्यमांद्वारे व्हायची. नागपूर, अकोला, पुणे व मिरज लॉजमधील सदस्य यात प्रामुख्याने सहभागी होते. नागपूर, अकोला, पुणे येथील लॉजचे सदस्य आपापल्या घरी भारत समाज पूजा करत आहेत. थिऑसॉफिकल ऑर्डर ऑफ सर्व्हिस (टी.ओ.एस्.) अकोट व अमरावती ग्रुपतर्फे गरीब व गरजूंना अन्नधान्य देण्यात आले. रोग निवारण विधी देखील घरच्या घरी आयोजित करण्यात आला. थिऑसॉफीच्या कार्यामधे सर्वांचे योगदान मिळत आहे.

थिऑसॉफीच्या कामाचा एक महत्वपूर्ण पैलू म्हणजे स्वतःची तयारी. थिऑसॉफिकल सोसायटीचे ध्येय व उद्दिष्टांसाठीचे सेवाकार्य आणि स्वतःची तयारी या दोन्ही एकत्र चालणाऱ्या प्रक्रिया असावयास हव्या असे अभ्यासकांचे सांगणे आहे. अभ्यासकांच्या मते स्वतःवर काम केल्याशिवाय आपण थिऑसॉफिकल सोसायटीच्या ध्येय व उद्दीष्टांवर कार्य करू शकत नाही. आणि म्हणूनच थिऑसॉफिकल साहित्य व संदर्भामधे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे 'स्वतःच्या तयारीला' खूप महत्व देण्यात आले आहे. थिऑसॉफीशी जुळलेली

प्रत्येक व्यक्ती महत्त्वपूर्ण व संवेदनशील आहे. आपण आपल्या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडू या!

आपला बंधु
संजय दि. पोटे (ॲड.)
अध्यक्ष, म.थि.फे., पुणे.

---

**कर्मफल चिंतन**

कर्माचा सिद्धांत अगदी थोडक्यात असे सांगतो की, **'जसे पेराल तसे उगवेल'**, **'जैसी करनी वैसी भरनी'**. जसे कारण असेल त्याप्रमाणे कार्य होते. उदाहरणार्थ, मी संथ, शांत अशा सरोवरात एक खडा टाकला तर पृष्ठभागावर खळबळ माजेल, तरंग उठेल. 'खडा फेकला' हे **कारण** आणि 'तरंग उठले' हे **कार्य**. ज्याप्रमाणात कारण प्रबळ, जोरदार त्याप्रमाणात कार्य जास्त ठळक, जास्त प्रभावी, जास्त परिणामकारक असणार. कर्माचा सिद्धांत हा अटळ, न बदलता येणारा असा सृष्टिनियम, निसर्गनियम आहे. हा नियम सर्वव्यापी आहे. संपूर्ण सृष्टीला तसेच प्रत्येक माणसाला हा नियम लागू आहे. माणसापुरता विचार केला तरी माणसाच्या सर्व क्रियांना हा नियम लागू आहे. त्याची प्रत्यक्ष कृति (Actions of Physical Body), भावना, इच्छा (Emotions), विचार (Thoughts) आणि नैतिक कृत्ये (Moral Deeds) या सर्वांना तो लागू आहे. माणसाला ज्या सुखदुःखांना सामोरे जावे लागते ती सुखदुःखे ही या कर्मनियमाच्या पालनावर किंवा उल्लंघनावर अवलंबून असतात.

---

**Ponder Over It**

India -- my India which I love so deeply, my true Motherland and that of my Master -- is she not also a Nation, are not her people a chosen people? Chosen, yes. But for what? Chosen to emphasize always the higher, the nobler, the less material aspect of life.

-- Dr. Annie Besant

# जे. कृष्णमूर्ती, थिऑसॉफी आणि थिऑसॉफिकल सोसायटी

**अर्जेंटिनातील सन राफेल थिऑसॉफिकल केंद्राच्या तरूण सदस्यांच्या प्रश्नांना श्रीमति राधा बर्नियें यांनी दिलेली उत्तरे (एप्रिल २००४)**

**अनुवाद – बंधु डॉ. विनायक मिराशी**

(पुर्नमुद्रित)

**(हा संवाद प्रश्नोत्तर स्वरूपात होता. प्रश्न २ आणि त्याचे उत्तर डिसेंबर – जानेवारी २०२० च्या अंकात छापले होते. प्रश्न १ आणि त्याचे उत्तर खूप मोठे असल्याने तेथे छापले नव्हते. ते येथे छापत आहोत. – संपादक)**

**प्रश्न १ : ज्यावेळी जे. कृष्णमूर्तींनी थिऑसॉफिकल सोसायटीचा त्याग केला त्यावेळी त्यांनी थिऑसॉफिकल सोसायटीच्या सदस्यांना, तसेच ज्या महात्म्यांनी त्यांना काही सूचना दिलेल्या होत्या त्या सर्वांना (जे. कृष्णमूर्तींनी) आपले खरे स्वरूप दाखविले (विश्वासघात केला) असे बरेच लोक बोलतात, त्यावर आपले काय मत आहे?**

**उत्तर : राधाजी :** बरेच नव्हेत पण काही लोक असे बोलतात. ही चुकीची धारणा आहे असे मला वाटते. कृष्णमूर्तींनी थिऑसॉफिकल सोसायटीचा अथवा ज्यांनी त्यांना सूचना दिल्या त्या महात्म्यांचा विश्वासघात करण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. महात्म्यांशी आपला संबंध असल्याचा दावा करण्याऱ्या सदस्यांचा एक गट त्यावेळी थिऑसॉफिकल सोसायटीमध्ये होता आणि त्यांनी स्वतःला काही अधिकार असल्याचे गृहीत धरलेले होते. 'तुम्हाला प्रशिक्षणार्थी या पदावर नेमलेले आहे आणि अन्य कुणीतरी महात्म्यांचे विद्यार्थी झालेले आहेत' असे घोषित करण्याचा हक्क प्राप्त झाल्याचा त्यांचा स्वतःबद्दल विश्वास होता. अथवा ''ज्यांना नुकतीच दीक्षा दिलेली आहे असे तुम्ही आहात'' असे ते त्यांना सांगत असत. परंतु 'मास्टर्स अँड दि पाथ' या पुस्तकात वर्णन केल्याप्रमाणे त्यांच्या वागण्यातून अपेक्षित निकष किंवा गुणवत्ता प्राप्त झाल्याचे दिसून येत नव्हते. 'मास्टर्स अँड दि पाथ' आणि अन्य काही पुस्तकात महात्म्यांनी ज्यांना दीक्षा दिली अशा शिष्यांचे वर्णन आहे. त्यामुळे महात्म्यांच्या संपर्कात असल्याचा दावा करणाऱ्यांचे बोलणे एखाद्या नाटकासारखे किंवा विनोदी प्रहसनासारखे होते. कृष्णमूर्तींना ते मुळीच आवडत नसे.

डॉ. ॲनी बेझंट या वृद्ध झालेल्या होत्या. थिऑसॉफिकल सोसायटीमध्ये तसेच भारताच्या स्वातंत्र्यासाठी, स्त्रियांच्या उद्धारासाठी, प्राण्यांची हत्या शास्त्रीय अभ्यासासाठी सुद्धा होऊ नये यासाठी, बालवीर, वीरबाला संघटनेच्या वाढीसाठी त्यांनी अथक कार्य केलेले होते. ज्या ज्या क्षेत्रात त्यांनी कार्य केले त्यांची आपल्याला कल्पनासुद्धा येणार नाही. अन्य कुणी त्यांच्याइतके कार्य केले नसते. वृद्धत्वामुळे त्यांची क्षमता कमी झालेली होती; त्यामुळे ''आम्हाला महात्म्यांनी दीक्षा दिलेली आहे. आम्ही त्यांच्या संपर्कात आहोत'' असा दावा करणाऱ्यांच्या बोलण्याला आणि कृतीला त्या प्रतिबंध करू शकत नव्हत्या. राधाजींचे वडील काही काळ डॉ. ॲनी बेझंट यांचे स्वीयसहाय्यक होते. योग्य व्यक्तींवर विश्वास ठेवण्याचा डॉ. ॲनी बेझंट यांचा स्वभाव होता. त्यांच्याबरोबर ज्यांनी काम केले त्यांच्यावर डॉ. ॲनी बेझंट यांनी विश्वास ठेवलेला होता; त्यामुळेच महात्म्यांच्या संपर्कात असल्याचा दावा करणाऱ्यांना त्यांनी विरोध केलेला नसावा. थिऑसॉफिकल सोसायटी चुकीच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे कृष्णमूर्तींना जरी जाणवत होते तरी ती वाटचाल ते थांबवू शकत नव्हते. त्यामुळेच त्यांनी थिऑसॉफिकल सोसायटीचा त्याग केला. कृष्णमूर्ती पुढे नेमके काय करतील? ते स्वतःची कशी काळजी घेतील? अशा विचारांमुळे ॲनी बेझंट विचलित झालेल्या नव्हत्या याची राधाजींना खात्री वाटते. कारण एकूणच जगातील गडबड गोंधळाच्या वातावरणात स्वतः ची काळजी घेण्याची त्यांनी तयारी केलेली नव्हती त्यामुळे थिऑसॉफिकल सोसायटीच्या काही सदस्यांना डॉ. बेझंट यांनी कृष्णमूर्तींची काळजी घेण्यास आणि त्यांच्याबरोबर कार्य करण्यास सांगितले.

कृष्णमूर्तींनी महात्म्यांचा विश्वासघात केला ही कल्पना राधाजींना हास्यास्पद वाटते. 'कृष्णमूर्ती महात्म्यांशी सतत संपर्कात होते' असे राधाजींचे व्यक्तीगत मत आहे. महात्म्यांविषयी जे अधिक बोलत आणि त्यांचे प्रतिनिधी असल्याचा दावा करीत असत त्यांच्यापेक्षा कृष्णमूर्ती महात्म्यांविषयी निश्चितपणे अधिक जाणत होते. त्यांच्या मते जे अत्यंत आदरणीय आणि पवित्र आहे ते व्यक्तीगत व्यवहाराच्या पातळीपर्यंत खाली आणणे ही थिऑसॉफिकल सोसायटीची चूक होती. ज्यावेळी एच्.पी.बी. महात्म्यांविषयी अधिक बोलत असत त्यावेळी 'महात्मा' या धारणेचे अवमूल्यन होण्याच्या भीतीने स्वामी टी. सुब्बारावसुद्धा त्यांना विरोध करीत असत. मानवाच्या प्रतिमेतूनच परमेश्वराची

निर्मिती होते अशी श्रद्धा आहे. त्याचप्रमाणे स्वतःला परिचित असलेले गुण सामान्य लोक महात्म्यांना चिकटवतात. वास्तवात त्याचा संबंध नसतो. महात्मे अत्यंत पवित्र, शुद्ध आणि ज्ञानी आहेत. ज्यांना महात्म्यांशी संपर्क साधायचा असेल त्यांनी स्वतःची पातळी उंचावली पाहिजे असे मॅडम ब्लॅव्हॅट्स्की यांनीच स्पष्ट केले आहे. महात्म्यांना मानवी व्यवहाराच्या पातळीपर्यंत खाली आणणे अशक्य आहे. महात्म्यांना भूतलावर आणण्याचा प्रयत्न सुरू होता. कृष्णजींनी महात्म्यांविषयीच्या अशा संकल्पना नाकारल्या पण मुक्त असलेल्या महात्म्यांचे अस्तित्व नाकारले नाही.

ज्यावेळी ही प्रक्रिया सुरू होती त्यावेळी 'ते इथे आहेत' पण 'ते' म्हणजे कोण? ते त्यांच्या मेंदूशी (बुद्धीशी, मनाशी) काही कार्य करीत होते असे कृष्णमूर्ती कधीकधी म्हणत असत; असे कृष्णमूर्तींच्या जीवनप्रवासाचा गोषवारा घेणाऱ्या पुपुल जयकर यांचे मत आहे. मृत्यूपूर्वी ते, ''मी जाण्याच्या तयारीत आहे. ते माझी वाट पहात आहेत.'' असे बोलल्याचे त्यावेळी त्यांच्याजवळ असलेले लोक सांगतात. थिऑसॉफिकल सोसायटीमध्ये महात्मे ज्या ठिकाणी राहतात त्याविषयी खूप काही रंगवून सांगितले जाते. प्रत्येकाच्या केसांच्या रंगापासून सर्व तपशील बोलला जातो. जरी सर्व तपशील बरोबर असला तरी तो बाह्य स्वरूपाशी निगडीत आहे. **महात्मा ही मनाची अत्यंत जागरूक अवस्था आहे.** महात्मे एखादे वेळी एका देहात असतात तर दुसऱ्यावेळी दुसऱ्या देहात असतात. मानवाप्रमाणे शरीर असणारे व तसे दिसणारे असा महात्म्यांचा विचार करणे चुकीचे आहे. जे लोक महात्म्यांना भेटू इच्छितात त्यांना ते काय बोलतात तेच कळत नाही असे मॅडम एच्.पी.बीं.नी लिहून ठेवलेले आहे. कारण मानवी शरीर हे केवळ आवरण (बाह्यस्वरूप) आहे ते वास्तव (सत्य) नाही. आपल्या बाबतीतदेखील ही वस्तुस्थिती आहे. भिन्न वास्तव बंदिस्त करणारे शरीर हे आवरण आहे. **महात्म्यांच्या बाबतीत जागरूकतेची उच्च पातळी आणि दर्जा हे वास्तव आहे.** महात्म्यांना अशा तपशिलाद्वारे संकुचित करणे आणि स्वतःप्रमाणे ते आहेत असा विचार करणे कृष्णमूर्तींना आवडत नसे.

**प्रश्न ३ : कृष्णमूर्तींनी महात्म्यांना नाकारले होते का? त्यांनी शिष्यत्वाचा मार्ग नाकारला होता का?**

**उत्तर** : कृष्णमूर्ती नेहमीचे शब्द वापरत नसत. त्यांनी 'शिष्यत्वाचा मार्ग' यासारखे शब्द वापरले नाहीत. ''सत्य म्हणजे मार्ग नसलेली भूमी आहे'' असे

ते म्हणत असत. प्रत्येकातील मूळ अणू अद्वितीय असतो व दृश्य पदार्थाच्या पातळीवर तो अणू स्वतःचा स्वतंत्र व्यवहार करतो असा थिऑसॉफीचा दृष्टीकोन आहे. प्रत्येकाचा विकास इतर कुणापेक्षाही वेगळा असतो. विश्वात सर्वत्र असेच घडते. कोट्यावधी व्यक्तींपैकी प्रत्येकाच्या बोटाचे ठसे वेगळे व ओळखू येण्यासारखे असतात असे काही वर्षांपूर्वी मानले जात असे. पण दात, केस, स्वरयंत्र (आवाज) अशा घटकांवरूनसुद्धा व्यक्ती ओळखता येते असे अलिकडे मानण्यात येऊ लागलेले आहे. शारीरिक पातळीवरसुद्धा अद्वितीयता असते असा त्याचा अर्थ आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या आकलनशक्तीनुसार सत्याच्या दिशेने जावे. त्यांना अन्य कुणीही 'याच मार्गाने जा' असे सांगू नये.

कृष्णजी मार्गाविषयी, शिष्यत्वाविषयी बोलले नव्हते कारण शिष्याने आज्ञाधारक असण्याची अपेक्षा असते. आंधळा आज्ञाधारकपणा हुशारी व ज्ञानप्राप्तीच्या मार्गातील अडथळा ठरतो असे त्यांना वाटत असे. खरीखुरी हुशारी व एखादा विषय चटकन समजण्याची क्षमता यांना ते अंतर्ज्ञान म्हणत असत. सामान्यजनांच्या मनात शब्दांचे सोपे अर्थ असत. त्यावेळी कृष्णजी स्वतःच्या मनातील विचार श्रोत्यांना अचूक समजावेत यासाठी त्याच अर्थाचे वेगळे शब्द उच्चारत असत.

**प्रश्न ४ : एच्.पी.बी. व महात्म्यांनी ज्याला गूढविद्या म्हटले त्याच्याशी कृष्णमूर्तींचे कार्य संबंधित नव्हते असे थिऑसॉफिकल सोसायटीचे काही सदस्य म्हणतात.**

**उत्तर** : जे उघड झालेले नाही ते गूढ. ग्रहणशक्ती मर्यादित असलेल्या आपल्या ज्ञानेंद्रियांपासून कितीतरी गोष्टी अज्ञात आहेत. काही शतकांपूर्वी जर तुम्ही एखाद्या साधनाची कळ दाबून दोन हजार मैलांवरील संगीत ऐकले असते तर अनेकांना तो जादूचा प्रकार वाटला असता. परंतु ते विज्ञानामुळे शक्य असल्याचे पुढील काळात सिद्ध झाले. **जेव्हा तुम्ही निसर्गाचे व विज्ञानाचे नियम समजून घेता तेव्हा बरेचसे ज्ञान गूढ रहात नाही.** पण माहित नसताना जे माहीत असल्याची स्वतःची समजूत करून घेतात त्यांच्याबाबतीत ते ज्ञान गूढच राहते. स्वतःच्या फायद्यासाठी ते चुकीची माहिती समाजामध्ये पसरवतात. (उदा. अफवा) त्यामुळे थिऑसॉफिकल सोसायटीमध्ये तथाकथित गूढ गोष्टींना प्रोत्साहन दिले जात नाही. ॲलिस बेली सूर्यकिरणांविषयी काय म्हणतात ते

बरोबर आहे व ते नेमके काय आहे हे किती लोक जाणतात? अशा प्रश्नांविषयी कोणतीही शंका मनात ठेवू नये. एच्.पी.बी. किंवा लेडबिटर यांच्याबाबतसुद्धा अशीच भूमिका असावी. एखादा मुद्दा स्वीकारणे वा नाकारणे याबाबत आपले मन खुले असावे. एखाद्या निर्णयाविषयी वा विधानाविषयी संदिग्धता असणे महत्वाचे ठरते. एका व्यक्तीच्या शरीरात विषारी बाण घुसल्याची बुद्धांनी सांगितलेली कथा आठवावी. तो बाण कोणत्या दिशेने आला असेल? अशी चर्चा त्यावेळी पूर्णपणे अप्रस्तुत आहे. ज्या ठिकाणी तो बाण लागला तेथून तो दूर करणे व त्या ठिकाणच्या जखमेवर उपचार करणे हे त्यावेळी महत्वाचे ठरते म्हणून गूढ गोष्टींविषयी बुद्ध बोलत नसत. कृष्णमूर्तींचा दृष्टीकोनही तसाच होता. ते म्हणत, ''तुमचे घर जळत आहे याचा अर्थ सर्व जगच धोक्यात आहे. अशा वेळी जे गूढ असेल त्याविषयी न बोलता आपले लक्ष संकट निवारण्याकडे देणे महत्वाचे नाही का?'' लोकांनी स्वतःचे लक्ष विचलित करू नये यावर त्यांचा कटाक्ष असे. सामान्यजनांना ज्याची काहीच माहिती नाही अशा अनेक गोष्टींची माहिती असलेले ते ज्ञानी व्यक्ती होते.

★★★

---

रोजच्या जीवनात माणसाला आलटून पालटून अनुकुल आणि प्रतिकुल परिस्थिती लाभते. त्यानुसार तो उत्साहाच्या आणि नैराश्याच्या हिंदोळ्यावर झुलत रहातो. हे झाले सर्वसामान्य माणसांच्या बाबतीत. पण ज्याने अध्यात्मिक मार्गावर दोन पावले पुढे टाकली आहेत त्याचा याबाबतीतला दृष्टीकोन वेगळा असतो. अनुकुल परिस्थितीत सुखाच्या लाटेवर असताना स्वतःला ढिले पडू न देता, निष्क्रीय न ठेवता तो या अनुकुल उर्जेचा सक्रीय वापर करून, तो जे मुक्तीमंदीर उभारत असतो, त्याचा पाया आणखी पक्का बनवतो व मुक्तीमंदीराचे खांब पुढील प्रवासासाठी आणखी सक्षम मजबूत करतो. जेव्हा परिस्थिती प्रतिकुल असते तेव्हा हा अडथळा न मानता आंतरिक विकासाला अत्यावश्यक असणारे इच्छाशक्ती, धैर्य व संयम या त्रिगुणात वाढ करण्यासाठी ही संधी असे मानतो. **हे सर्व सहजतेने साध्य करणे यालाच अध्यात्म म्हणतात.**

# मानवतेच्या सेवकांचा समूह (Band of Servers)

**– भगिनी सुमतीताई कुलकर्णी, पूना लॉज.**

१४ मे १८९४ मधे 'इराटो' यांचे मागचे जन्म दिव्य दृष्टीने तपासण्यासाठी 'मास्टर्स'नी परवानगी दिली. त्यानंतर 'ओरायन', 'स्पायका', 'अल्किओनी' यांचे मागचे जन्म दिव्य दृष्टीने किंवा आंतरदृष्टीने म्हणू या हवतर तपासले गेले आणि अनेक जन्मांमधून फिरणाऱ्या जीवात्म्याला त्यांनी एकेक नाव दिले. वर उल्लेखिलेली नावं ही अशीच वेगवेगळ्या जीवांना दिलेली आहेत. दिव्य दृष्टीने या सर्वांचे मागचे जन्म तपशीलवार तपासताना असं लक्षात आलं की काही जीवात्मे पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या नात्यांनी पण एकत्र जन्म घेतात व एका जीवात्म्याबरोबर पुन्हा पुन्हा दिसतात.

अल्किओनींच्या बरोबर किंवा थोडाफार मागेपुढे जन्म घेणारा समूह हा 'वैवस्वत मनू'चा पाचवा मानववंश आणि त्याचे उपवंश यांच्या बांधणीच्या कार्यात मदत करीत आहे. ईश्वरी योजनेच्या कार्यात स्वतःला झोकून देऊन जन्मापाठीमागून जन्म या योजनेला सहाय्यभूत होण्यासाठी धडपडणाऱ्या या समूहाला मॅडम ॲनी बेझंट व सी. डब्ल्यू. लेडबिटर यांनी नाव दिलं Band of Servers किंवा मानवतेच्या सेवकांचा समूह. या ग्रुपने 'पायोनिअरिंग वर्क' दोन Master's of Wisdom च्या मार्गदर्शनाखाली केलं.

अशा प्रकारचं काम अनेक ठिकाणी होत असतं. तेही जीवात्मे ईश्वरी योजना कार्यान्वित करण्याचे व पुढील पिढीला रस्ता सुकर करण्याचे काम करीत असतात. उदा. १) धोंडो केशव कर्वे. यांनी मुलींच्या शिक्षणासाठी आणि स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी जे काम केले त्यामुळे पुढच्या पिढीच्या स्त्रियांचं जगणं सुसह्य झालं. स्त्रियांना प्रगतीची घौडदौड करता आली. २) राजा राममोहन रॉय यांनीही सतीची चाल बंद करण्यासाठी प्रयत्न करून पुढच्या पिढीच्या स्त्रियांच्या पायाखालचे निखारे दूर केले. यांचे मागचे जन्म तपासले गेले नाहीत आणि प्रत्येकाच्याबाबत ते शक्यही नसते. पण मॅडम ॲनी बेझंट व सी. डब्ल्यू. लेडबिटर यांनी जे. कृष्णमूर्ती यांचे (जीवात्म्याला दिलेले नाव 'अल्किओनी') मागचे जन्म संशोधित करताना ७०,००० वर्ष इ.स. पूर्व इतक्या मागच्या काळापर्यंत जाऊन जे प्रचंड कार्य केलेले आहे त्यातून अनेक निष्कर्ष काढता येतात.

आपण पुन्हा पुन्हा जन्म घेतो हे थिऑसॉफिस्ट लोकांनी मान्य केलेले तत्त्व आहे. पुन्हा पुन्हा जन्म कशासाठी तर उत्क्रांतीसाठी. God has a plan and that plan is evolution आणि ईश्वराची ही इच्छा (Will) असं सुनियंत्रित व अखंड प्रेशर निर्माण करत असते की आपण पुढे पुढे जात राहतो. १) Law of Evolution २) स्वतःचे कर्म ३) इतर जीवांबरोबर निर्माण केलेले भले बुरे संबंध यांमुळे आपण कुठे – कधी – कसा जन्म घेणार ते ठरते आणि एखाद्या ग्रुपबरोबर आपण पुन्हा पुन्हा देह धारण करतो. वर उल्लेखिलेल्या सेवकांच्या समूहामध्ये निस्वार्थी – निरपेक्ष प्रेम ही एक जबरदस्त शक्ति आहे. जी या जीवांना प्रत्येक जन्मात एकत्र आणते. निस्वार्थ प्रेम – त्याग हा इतका प्रचंड फोर्स आहे की तो कर्माचे नियमही वळवून, सुधारून घेतो. मागच्या ७०,००० इ.स. पू. पासून जीवनाचा आणि काळाचा प्रवाह पाहिला असता हा 'बँड ऑफ सर्व्हर्स' एका ध्येयाने प्रेरित होऊन एकत्र येतो. मनूंच्या कार्यात जीव ओतून सहकार्य करतो आणि त्यांची आज्ञा व नियम पाळतो.

सुरूवातीची कित्येक हजारो वर्षे हे सर्वजण कुठल्या ना कुठल्या स्वरूपात एकमेकांच्या नात्यात जन्माला आले आहेत. कधी अगदी जवळच्या कधी दूरच्या. आता म्हणजे मागच्या शतकातील जन्मामधे हा सर्व ग्रुप दूरदूरच्या देशात जन्म घेतलेला आहे. नातेसंबंधाने एकत्र बांधला गेलेला नाही पण नातेसंबंधांपेक्षाही घट्ट बांधणारा पक्का धागा त्यांच्यामधे होता, तो म्हणजे common interest in a common work as loyal members of Theosophical Society आणि यांच्यापैकी काहींना असं वचन दिलं गेलं होतं की ते कधीही अलग होणार नाहीत.

हजारो वर्षांच्या ऋणानुबंधानंतर सभासदांचे एकमेकांशी असलेले भावबंध इतके पक्के झालेले होते की वेगवेगळ्या देशात, वेगवेगळ्या परिस्थितीत जन्माला येऊनसुद्धा – पूर्णपणे अपरिचित असतानाही प्रत्यक्ष भेट झाल्यावर जन्मजन्मांतरीची ओळख पटून सर्वजण एका ध्येयाने प्रेरित होऊन एकत्र वाटचालीला सिद्ध होतात. 'Old Diary Leaves' वाचताना याची अनुभूती येते. झोराष्ट्रीयन धर्माच्या स्थापनेच्या वेळी हा सर्वच ग्रुप पूर्वतयारीसाठी पर्शियामधे एकत्र आलेला दिसतो तर थिऑसॉफिच्या स्थापनेसाठी आणि प्रचारासाठी जगाच्या वेगवेगळ्या भागात जन्म घेताना दिसतो पण तरीही जणू एक एकसंध आकृती.

सर्वांच्याच कृतीपेक्षा कृतीमागच्या भावना सर्वांना एकत्र आणतात; कारण कृती ही पूर्वीच्या किंवा पूर्वजन्मीच्या विचारांचं, भावनांचं मूर्त स्वरूप असते. तसेच एकूण या सर्व समूहाचा विचार केल्यावर असं दिसतं की एकेका जीवाची उत्क्रांती नाही होत. we evolve as a group. Everything co-evolves. living & non living. अगदी आपण जीव लावलेले पाळीव प्राणीसुद्धा. जो ईश्वराचे नियम न पाळल्याने ग्रुपपासून अलग होतो त्या जीवाची प्रगती थांबते, आणि म्हणून सत्संगाची महती आहे. सद्गुरूचा प्रभाव शिष्याला तारतो. चुकीच्या संगतीने उत्क्रांतीच्या प्रवाहातून तुटून बाजूला झालेले, या सेवक समूहातून विलग झालेले जीवही या प्रवासात दिसतात. एकदा अधःपतन झाल्यावर अनेक जन्मातल्या दुःखातून शिकून हजारो वर्षांनी त्यांना या Band of Servers बरोबर येता आलं.

या समूहापैकी प्रत्येकजण उत्क्रांतीच्या वेगवेगळ्या पायरीवर आहे; तरीही प्रत्येकजण मानवजातीच्या सेवेतून मानवी पुनरुत्थानाच्या ईश्वरी कार्यात सहभागी झाले आणि आज त्यातील अनेक परिपूर्ण मानव बनून जगाला प्रकाश दाखवत आहेत.

★★★

## जीवन्मुक्त गुरू एकच गोष्ट दोनदा सांगत नसतात

जीवनमुक्त गुरूंच्या शिष्यांना जगासाठी काम करत असताना एकच गोष्ट लोकांना पुनःपुन्हा दोनदा – तीनदा सांगावी लागते. आमच्या गुरूंनी जे उद्योग आमच्या स्वाधीन केले आहेत त्यातल्या पुष्कळ गोष्टी आम्हाला लोकांना पुनःपुन्हा सांगव्या लागतात कारण लोकांना कळकळ नसते व ते दुर्लक्ष करीत असतात. जीवनमुक्त गुरूंशी प्रत्यक्ष संबंध जडला म्हणजे मग शिष्य दुर्लक्ष करणार नाही एवढ्या पायरीपर्यंत तो आला असला पाहिजे. गुरूंनी एकदा एखादी सूचना केली म्हणजे ती त्याला पुरेशी व्हावयाला हवी. ती त्याने स्वीकारली नाही तर पुन्हा तीच सूचना त्याला कदापि ते करणार नाहीत. गुरू अभिमानी असतात असा त्याचा अर्थ नव्हे तर शिष्याची पुरेशी तयारी नाही असा त्याचा अर्थ आहे.

**– सी. डब्ल्यू. लेडबीटर**

# थिऑसॉफिस्टची कर्तव्ये

१. माझे प्रथम कर्तव्य माझ्या गुरूंबद्दल आहे आणि तुला सांगणे आवश्यक आहे की, मैत्री किंवा प्रीतीपेक्षा आम्ही कर्तव्य श्रेष्ठ मानतो. जणू एक अविनाशी सिमेंटने, जगाच्या पाठीवर एकमेकांपासून दूरदूर अंतरावर विखुरलेल्या आम्हा सिद्धांना – जे निसर्गातील महान गूढ गुपितांचे रक्षक आहोत – एकत्र ठेवले आहे. असे चिरकालिक, अविनाशी कर्तव्यरूपी सिमेंट (तत्त्व) नसते तर फक्त आमचा सिद्धसंघच नव्हे तर आमचे सिद्धांत (doctrine) सुद्धा आत्तापर्यंत केंव्हाच फुटून कण-कण होऊन धुळीत मिळाले असते.

– कुथूमी

1. My first duty is to my Master. And duty, let me tell you, is for us, stronger than any friendship or even Love; as without this abiding principle, which is the indestructable cement that has held together for so many milleniums, the scattered custodians of nature's grand secrets - our Brotherhood, nay our doctrine itself - would have crumbled long ago into unrecognizable atoms.

- K. H.

२. थिऑसॉफिस्टाचे कर्तव्य शेतकऱ्याच्या कर्तव्याप्रमाणे आहे; जमीन नांगरून शक्य तितक्या चांगल्या प्रकारे बीज पेरणे. त्यानंतरचे परिणाम निसर्गावर अवलंबून आहेत आणि निसर्ग सृष्टीनियमांचा गुलाम आहे.

– कुथूमी

2. The Theosophist's duty is like that of the husbandman's, to turn his furrows and sow his grain as best he can : The issue is with nature, and she, the slave of law.

- K. H.

**आपल्या जबाबदाऱ्या आपणास टाळता येतील**
**पण त्या टाळल्यानंतर होणारे परिणाम मात्र**
**आपणास टाळता येणार नाहीत.**

# दामोदर आणि थिऑसॉफिकल चळवळ

**प्रेषक – नितीन अभ्यंकर, पूना लॉज.**

**(मी पूना लॉजमध्ये जुलै २०१९ पासून महिन्यातून एकदा या विषयावर बोलत आहे. तेच व्याख्यान येथे क्रमशः देत आहे.)**

या काळात – विशेषतः दामोदरने त्यांच्या गुरूंना पाहिल्यावर (अर्थात सूक्ष्मलोकात) – दामोदरला महात्म्यांकडून जे संदेश किंवा पत्रे यायची त्यावर .. (३ डॉटस्) असायचे. हे महात्म्यांचे आणि त्यांच्या सिद्धसंघाचे सांकेतिक चिन्ह आहे. यासंदर्भात पत्राच्या शेवटी जज म्हणतात, ... (३ डॉटस्) यांच्याकडून येणाऱ्या संदेशांबद्दल मला लिहायला विसरू नकोस.

१४ जून १८८१ ला लिहिलेल्या पत्रात दामोदर लिहितात, मी एका विशिष्ट स्थळी होतो जेथे 'त्यांच्या' सल्लामसलत–सभा चालत. तेथे 'ते' (येथे 'ते' म्हणजे .. (३ डॉटस्)) दिसले. त्यानंतर त्यांना मी २–३ वेळा एकट्याने पाहिले. अशा वेळी क्वचित ते माझ्याशी 'मी पुढे नक्की काय करावे' याबाबत धीराचे आणि चांगल्या सूचनांचे काही शब्द बोलायचे. ज्यावेळी मध्यरात्री माझे त्यांच्याशी संभाषण व्हायचे ते माझ्यासाठी आनंदाचे क्षण असायचे. अशा वेळी कोणी अडथळा आणत नसे.

दामोदर सिलोनमधला असाच एक प्रसंग सांगतात. त्या दौऱ्यावर दामोदर एच.पी.बी. व एच.एस.ओ. बरोबर गेले होते. आमचा एका खेड्यात मुक्काम होता. आम्ही सर्व रात्री १ ला झोपलो. पुरेशा जागेअभावी मी आरामखुर्चीत झोपलो. दरवाजा नुसता लोटलेला होता. इतक्यात मला दारावर हलकी थाप ऐकू आली. मी दरवाजा उघडला आणि मला अत्यानंद झाला कारण दारात ते उभे होते. अगदी हळू आवाजात त्याने मला तयार होऊन पाठोपाठ यायला सांगितले. आमच्या विश्रामगृहाच्या मागे समुद्र होता. ते व मी सुमारे पाऊण तास समद्रावर चाललो. नंतर आम्ही दोघांनी समुद्राकडे तोंड केले व सुमारे ७ मिनिटे चाललो. आता आम्ही एक अगदी बेट वाटावे अशा ठिकाणी आलो. त्या बेटावर सुमारे ५ मिनिटे चालल्यावर आम्ही एका इमारतीपाशी आलो. तेथे एका छोट्याशा बागेत एक महात्मा बसले होते. मी त्यांना याआधी कॉन्सिल रूममध्ये पाहिले होते आणि ही जागा त्यांच्या मालकीची होती. ते दोघे शेजारी शेजारी बसले व मी त्यांच्या जवळ उभा राहिलो. तेथे आम्ही अर्धा तास होतो.

मग मला तेथील एक ठिकाण दाखवले गेले. किती आल्हाददायक जागा होती ती! आत अजून एक छोटी खोली होती. ज्यावेळेस महात्मे सूक्ष्मदेहाने इतरत्र वावरत त्यावेळी त्यांचे शरीर त्या खोलीत असते. किती मोहक, आनंददायी ठिकाण होते ते! गुलाब व इतर फुलांचा छान सुवास दरवळत होता. मला परत सिलोनला आल्यावर या ठिकाणी भेट द्यायला मिळाली तर किती बहार येईल! अजून अर्धा तास गेला आणि आमची निघण्याची वेळ झाली. ती जागा ज्यांची होती त्या महात्म्यांचे नाव मला माहीत नाही पण निघताना त्यांनी माझ्या डोक्यावर आर्शीवादाचा हात ठेवला. मी व ते निघालो. आम्ही परत माझ्या खोलीच्या दरवाज्यापाशी आलो आणि ते क्षणार्धात नाहीसे झाले.

**२१/६/१८८१ चे पत्र –** दामोदर जजना लिहितात, माझ्या मागच्या पत्रात मी ज्या ठिकाणी गेलो होतो त्याचे वर्णन केले आहे. त्याआधीही मला २ वेगळ्या ठिकाणी नेले होते पण त्याचे वर्णन करण्यास मला परवानगी नाही. मी एवढेच सांगू शकतो की, त्यातले एक ठिकाण कोलंबोच्या जवळ आहे आणि ते त्यांचे खाजगी घर आहे. दुसरे कँडीजवळचे एक ग्रंथालय आहे. सिलोनला असताना या तीन ठिकाणांशिवाय अजून एका चवथ्या ठिकाणी मला नेले होते. या सर्व ठिकाणी मी त्यांना आणि सिद्धसंघाच्या इतर सदस्यांना पाहिले.

दामोदर येथे आणखी एक प्रसंग सांगतात, सिलोनहून मुंबईला यायच्या बोटीवर आम्ही होतो. मी रात्रीच्या भोजनासाठी माझ्या खोलीत तयार झालो आणि जेवणानंतर घालण्याचा माझा कोट मी बॅगेतून काढला. माझ्या नेहमीच्या सवयीप्रमाणे मी कोटाचे खिसे तपासले व तो बिछान्यावर ठेवला. जेवणाचे टेबल माझ्या खोलीच्या बरोबर समोर होते आणि मधल्या काळात कोणीही माझ्या खोलीत गेले नाही. जेवण झाल्यावर मी खोलीत येऊन कोट घातला. मी सवयीने खिशात हात घातले आणि मला आत कागद असल्याची जाणीव झाली. मी तो कागद बाहेर काढला आणि आश्चर्य म्हणजे ते एच.पी.बीं.च्या नावाने असलेले पत्र होते. मी ते उजेडात नेले व मला त्यावर त्यांची सांकेतिक खूण दिसली. लिफाफा उघडा होता आणि त्यावर 'दामोदरने वाचण्यासाठी' असे लाल शाईने लिहिलेले होते. मी ते पत्र वाचले. ते परत त्याच गोष्टीशी – बिझनेसशी – निगडीत होते. (हा संदर्भ आला की सर्व ठिकाणी दामोदर 'बिझनेस' हा शब्दप्रयोग करतात. याचा नक्की अर्थ ते कुठेही स्पष्ट करत नाहीत. पण एकंदरीत असे वाटते की त्यांचे तिबेटला जाण्याचे, गुरूदेवांच्या आश्रमात

जाण्याचे जे ध्येय, मिशन होते त्याला ते 'बिझनेस' असे म्हणत असावेत.) याचाच विचार करत मी बिछान्यावर आडवा झालो. इतक्यात खोलीत पावलांचा आवाज ऐकला. मी खोली आतून बंद केली होती. वळून पाहीले तर ते आणखी दोघांबरोबर आले होते. परत एकदा आल्हाददायी संध्याकाळ! सुमारे अर्धा तास बिझनेस, ज्ञान, तत्त्वज्ञान यासंदर्भात त्यांनी मला अनेक बाबी सांगितल्या. असे क्षण माझ्या आयुष्यातील सर्वात आनंदी क्षण होते. असे प्रसंग अनुभवण्यासाठी स्वतःला योग्य बनवण्याचा मी निश्चय केला.

**२८/६/१८८१ चे पत्र –** या पत्रात दामोदर त्यांना आलेले अजून काही अनुभव जजना सांगतात. २७/८/१८८० ला एच.पी.बी. व एच्.एस्.ओ. मुंबई सोडतात आणि सिमल्याला जातात. मुंबई मुख्यालयात दामोदर व कोलंब दांपत्य होते. कोलंब दांपत्याला सोसायटीच्या कारभारात फारसा रस नव्हता. मी एच्.पी.बीं.च्या खोलीत एकटा काम करत बसे. तेथे दुसरे कोणीही नसे. सप्टेंबरच्या एका संध्याकाळी जेवणासाठी मी बंगल्यासमोर असलेल्या जेवणाच्या खोलीत गेलो. जेवण झाल्यावर बंगल्याच्या व्हरांड्यात आलो. प्रखर चंद्रप्रकाश होता. अचानक वातावरणात एक विशिष्ठ सेन्सेशन जाणवले. कोलंबबाईंना एच्.पी.बीं.च्या खोलीत पावलांचा व कपाट उघडण्याचा आवाज ऐकू आला. मी काही तसा आवाज ऐकला नाही पण मी खोलीत गेलो नाही कारण एच्.पी.बीं.नी जाण्याच्या आधी स्पष्टपणे बजावले होते की खोलीतून कोणतेही आवाज किंवा भास जाणवले तरी खोलीत अजिबात जायचे नाही. हे आवाज थांबल्यावर मी माझ्या खोलीत झोपायला गेलो. तेथे टेबलावर घड्याळ्याच्या पुढे एक मोठे त्रिकोणी पुडके होते. जेवायला जायच्या आधी ते तेथे नव्हते याची मला खात्री होती. मी ते पुडके घेतले व उघडले. आतमध्ये एक त्रिकोणी घडी केलेली, फकीर वापरतात तशी टोपी होती. टोपीच्या आत 'To Damodar' असे लिहिलेले होते आणि .. (३ डॉटस्) ही सिद्धसंघाची खूण होती. ही टोपी मी अजून जपून ठेवली आहे व कायम जपून ठेवीन. या प्रसंगानंतर मला ... (३ डॉटस्) कडून अनेक वेळा गूढ पद्धतीने संदेश मिळाले.

अशाच एका रात्री The Theosophist चे काम संपवून मी १ च्या सुमारास झोपायला गेलो. नेहमीप्रमाणे झोपायच्या आधी टेबल आवरून टेबलाचे कप्पे बंद केले. सकाळी उठल्यावर मधला कप्पा उघडला तर आत एक चिठ्ठी होती.

त्यावर 'Damodar K. Mavlankar' by order of ...(३ डॉटस्) असे लिहिले होते. मी चिठ्ठी उघडली. आतमध्ये अतिशय शुद्ध आणि उच्च हिंदुस्थानी मध्ये काहीतरी लिहिले होते. मला ते काहीच समजले नाही. काहीच दिवसात यातील मजकुराचे इंग्रजी भाषांतर असलेले पत्र मला पोस्टाने आले. दामोदर जजना लिहितात, मी असे सर्व प्रसंग तुला सांगू लागलो तर एक ग्रंथच तयार होईल. **नंतर ते आणखी असाच एक खूप महत्वाचा अनुभव वर्णन करतात.**

एकदा रात्री २ वाजता माझे काम आटपून मी खोलीचा दरवाजा बंद केला आणि बिछान्यावर आडवा झालो. २-३ मिनिटांनंतर मी एच्.पी.बीं.चा त्यांच्या खोलीतून हाका मारण्याचा आवाज ऐकला. मी पटकन त्या खोलीत गेलो. त्या मला म्हणाल्या, ''काही व्यक्तींना तुला भेटायचे आहे.'' त्या लगेच पुढे म्हणाल्या ''आता बाहेर जा माझ्याकडे पाहू नकोस.'' त्याप्रमाणे वळून जाण्याच्या काही सेकंद आधी मी पाहिले की एच्.पी.बी. तेथून नाहीशा होत आहेत व तेथूनच ... (३ डॉटस्) यांची आकृती साकार होत आहे. त्याच वेळी तिबेटियन वेष परिधान केलेल्या आणखी दोन व्यक्ती मला दिसल्या. त्यातील एक व्यक्ती .. (३ डॉटस्) च्या बरोबर एच्.पी.बीं.च्या खोलीत थांबली तर दुसरी व्यक्ती माझ्या बिछान्यावर जाऊन बसलेली मला दिसली. मी खोलीतील व्यक्तीला सलाम केला आणि विचारले ''माझ्यासाठी काही आदेश आहे का?'' ती व्यक्ती म्हणाली "If there are any, they will be given to you, without being asked" नंतर त्या व्यक्तीने मला थोड्या वेळासाठी एका जागी स्थिर उभे रहायला सांगितले आणि माझ्याकडे एकटक पहात राहिली. मी माझे शरीर सोडून जात असल्याची सुखद जाणीव मला झाली. यात आणि इथून पुढे जे मी सांगणार आहे त्यात किती वेळ गेला ते मी सांगू शकणार नाही. मला जाणवले की मी हिमालयाच्या पायथ्याशी काश्मिरच्या वरच्या टोकाला एका विशिष्ठ ठिकाणी आहे.

त्याठिकाणी समोरासमोर दोन घरे होती. बाकी मानवी वस्तीचे कोणतेही चिन्ह नव्हते. त्यातील एका घरातून जी व्यक्ती बाहेर आली ती माझ्या सदैव संपर्कात होती आणि तिनेच मला मगाशी सांगितलेले उच्च हिंदुस्थानीतील पत्र लिहिले होते. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ए. पी. सिनेटच्या 'The Occult World' या पुस्तकात आपले नाव लिहिण्याची परवानगी त्या व्यक्तीने ए.पी. सिनेट ला दिली होती. ए.पी. सिनेटने हे पुस्तक या व्यक्तीलाच अर्पण केले

आहे म्हणून मला पण तुला त्या व्यक्तीचे नाव सांगण्याची परवानगी आहे. ही व्यक्ती म्हणजे कुथुमी. (Koot Hoomi) Brother K चेच हे घर होते. Brother K यांनी मला त्यांच्यापाठोपाठ यायला सांगितले. साधारण अर्धा मैल चालल्यानंतर आम्ही हिमालयाच्या खाली असलेल्या एका नैसर्गिक भुयारापाशी आलो. हा मार्ग खूपच धोकादायक होता. एका नैसर्गिक बांधाखालून 'इंडस' नदीचा जोराचा खळाळता प्रवाह वाहत होता. या बांधावरून एका वेळी एकच जण जाऊ शकत होता. एक चुकीचे पाऊल पडले की सर्व संपले हे नक्की. याशिवाय आम्ही अनेक दऱ्या पार केल्या. या भुयारी मार्गावरून खूप वेळ चालल्यावर आम्ही L...K मधील एका मोकळ्या पठारावर आलो. येथे हजारो वर्षे जुनी असलेली एक प्रचंड इमारत होती. इमारतीसमोर इजिप्शियन टाऊ होता. इमारत एखाद्या पिरॅमिडसारखी भासत होती. सात मोठ्या खांबांवर ती उभी होती. प्रवेशद्वारापाशी एक त्रिकोणी कमान होती. आतमध्ये अनेक खोल्या होत्या. दामोदर लिहितात की, इमारत इतकी मोठी होती की त्यात २० हजार लोक सहज राहू शकले असते. यातील काही भाग मला दाखवण्यात आले. सिद्धसंघातील आपल्या सेक्शनची ही मुख्य मध्यवर्ती जागा आहे. जे दिक्षा घेण्यासाठी लायक होतात त्यांचा दिक्षा देण्याचा अंतिम समारंभ या जागी होतो. त्यासाठी आवश्यक अशा कालावधीसाठी लायक उमेदवार येथे रहातात.

मी माझ्या गुरूंबरोबर एका मोठ्या भव्य दिवाणखान्यात गेलो. त्या जागेची भव्यता आणि पावित्र्य कोणालाही थक्क करेल असे होते. मध्यभागी एक वेदी (Altar) होती जेथे दिक्षेच्या वेळी प्रत्येक उमेदवाराला शपथ घ्यावी लागते. डोळे दिपून टाकेल असे सौंदर्य या वेदीचे होते. 'चीफ'च्या सिंहासनाची शोभा अतुलनीय होती. येथील प्रत्येक गोष्ट भूमितीय तत्त्वांवर आधारित होती. येथे अनेक चिन्हे होती ज्याचा अर्थ फक्त दिक्षितांनाच उलगडून सांगितला जातो. याबद्दलही आता जास्त काही मी सांगू शकणार नाही कारण येथेच माझ्याकडून Brother K यांनी गुप्ततेची शपथ घेतली आहे. मी तसे वचन दिले आहे.

मी तेथे उभा असताना काय घडले माहित नाही पण अचानक मी माझ्या बिछान्यावर आलो. माझ्या मनात विचार आला की मी जे पाहिले ते काय होते? स्वप्न होते की वास्तव होते? पण वास्तव असेल तर मी ॲस्ट्रल देहाने इतक्या कमी वेळात संपूर्ण हिमालय पार करून कसा गेलो? मी गोंधळलेल्या स्थितीत शांत बसून होतो; इतक्यात माझ्या नाकावर एक चिठ्ठी पडली. मी ती

उघडून वाचली. त्यात लिहिले होते की हे स्वप्न नाही तर गूढ रितीने माझ्या ॲस्ट्रल देहाने मला दिक्षासमारंभाच्या ठिकाणी प्रत्यक्ष नेले गेले होते. जर मी स्वतःला लायक सिद्ध केले तर दिक्षासमारंभासाठी भविष्यात मी तेथे भौतिक देहाने उपस्थित असेन. त्या क्षणाला मला झालेला आनंद हा कोणत्याही कल्पनेपलिकडचा होता.

दामोदरच्या २१/६ च्या पत्रास उत्तर म्हणून जज २६/०७ ला पत्र लिहितात. पत्राचा एकंदर सूर निराशेचा आहे. त्यात ते त्यांची परिस्थिती, त्यांच्या व्यथा, त्यांच्यावर असलेल्या मर्यादा याबद्दल लिहितात. त्यांच्या घरी थिऑसॉफीला कसे प्रतिकूल वातावरण आहे त्याचे सविस्तर वर्णन करतात. घरच्यांचा महात्म्यांवर विश्वास नाही हेही नमूद करतात. बुद्धाने जे केले ते मी करू शकत नाही. इकडे भौतिकवादाचे प्रचंड प्राबल्य आहे. पूर्वी मी 'एम्' कडून शहाणपणाचे दोन शब्द ऐकायचो पण तेही आता बंद झाले आहे. माझ्यापुढे कोणताच मार्ग दिसत नाही. मी पूर्णपणे अंधारात चाचपडत आहे. कुठे जायचे ते मला माहित आहे. जन्म-मृत्युबद्दल मला समज आहे. माझा अंतरात्मा इतर कशाहीपेक्षा महत्वाचा आहे हे मला कळते तरीही मला माझ्या उन्नतीचा मार्ग दिसत नाही. माझ्या कुटूंबियांची काळजी घेतली जाईल इतके पैसे माझ्याकडे नाहीत. तसा मी वैयक्तिक स्तरावर मुक्त आहे पण या सगळ्या कारणांमुळेच मला सगळे सोडून थिऑसॉफीला वाहून घेता येत नाही. या सगळ्याबद्दल तू 'एम्' आणि ... (३ डॉटस्) कडे माझ्याबद्दल बोलशील का? जर याबाबत तुला अगोदरच मनाई केली असेल तर बोलण्याचा प्रयत्न करू नकोस. पण तसे नसेल तर ते तुझ्यामार्फत माझ्यासाठी काही सल्ला, संदेश देतात का ते पहा!

एकंदर या आणि मागच्या एक-दोन पत्रात जज हे स्वतःची दामोदर आणि इतर थिऑसॉफीशी निगडीत लोकांशी कळत नकळत तुलना करतात. त्या सर्वांना बाह्य परिस्थिती कशी अनुकूल आणि मला ती कशी प्रतिकूल आहे ह्यावर विशेष भर देतात. या पत्रातील दोन वाक्ये चिंतनीय आहेत.

१) **Each heart knowth its own burden**

२) **The word of honour is inconvient - Master M**

**६/९/१८८१ चे दामोदरने जजना लिहिलेले पत्र –** हे पत्र बरेच दीर्घ आहे. या पत्राचा काही भाग नंतर 'Reincarnation' या शिर्षकाने 'The Theosophist'

June 1884 मध्ये आणि 'Some views of an Asiatic' या शिर्षकाखाली 'The Path' January 1896 मध्ये प्रसिद्ध झाला.

दामोदर लिहितात, ११ जुलैच्या पत्रात तुम्ही विचारले आहे की Reincarnation बाबत तुमच्या श्रद्धा किंवा मते काय आहेत? येथे मी साध्या सरळ भाषेत माझी Reincarnation बाबतची पूर्ण श्रद्धा सांगतो.

मी सर्वेश्वरवादी (Pantheist) आहे. आस्तिक (Deist, Theist) नाही. मी मानतो की सर्व विश्व हे ईश्वरस्वरूपच आहे. पण हे लक्षात घे की माझ्या आकलनात गॉड म्हणजे जसे पाश्चिमात्य समजतात तसा देव नाही किंवा कोणतेही मानवी गुणविशेष जोडलेला देव नाही. तर **ईश्वर म्हणजे हे विश्व किंवा निसर्ग.** बाकी काही नाही. या अर्थाने मी नॅचरॅलिस्ट आहे. ईश्वर या विश्वाच्या बाहेर कुठे वेगळा नाही कारण तसे असते तर या विश्वात संतुलन, एकतानता (balance & harmony) साधलीच गेली नसती. **निसर्गाचे अपरिवर्तनीय नियम सतत कार्यरत आहेत म्हणूनच या विश्वात संतुलन आहे.** माझ्या मते आर्यन तत्वज्ञानाचे हे मुख्य तत्त्व आणि मुख्य शिकवण आहे.

ते पुढे लिहितात, काही तत्त्वज्ञानात मॅटर (Matter) आणि स्पिरिट (Spirit) यांचे वेगवेगळे अस्तित्व मानले आहे पण यावर खोलवर विचार केल्यावर मी या निष्कर्षास पोचलो आहे की **अमर्याद अस्तित्व हे एकमेव असू शकते. दोन नाहीत.** मग त्याला तुम्ही मॅटर म्हणा किंवा स्पिरिट म्हणा. तुम्ही कोणत्याही गोष्टीत हे मॅटर आणि हे स्पिरिट असे वेगळे दाखवू शकत नाही. तुम्ही मॅटर आणि स्पिरिट यांना विभागणारी रेषा तुम्ही काढू शकता का? एक उदाहरण घेऊ या. बर्फ हे मॅटरचे एक घन, स्थूल रूप आहे. बर्फाचे विरळ रूप पाणी. पाण्याचे अजून विरळ रूप म्हणजे वाफ. वाफेचे विरळ रूप म्हणजे वातावरण. वातावरणाचे विरळ रूप म्हणजे ईथर. तुम्ही असे कितीही विरळीकरण करत जा. प्रत्येक स्तरावर मॅटर या ना त्या स्वरूपात आहेच. ही Spiritualization ची प्रक्रिया आहे. यात तुम्ही जरी विरळीकरणाच्या अत्युच्च बिंदूपाशी पोचलात तरी त्यात मॅटर रहातेच. हा अत्युच्च बिंदू "nothing" होत नाही. कारण जर अशी कोणती nothingness ची अवस्था असेल तर एक वेळ अशी येईल जेव्हा संपूर्ण विश्व "nothing" असेल आणि जर असे असेल तर हे विश्व अमर्याद रहाणार नाही. त्याला अंत असेल आणि जर अंत असेल तर या विश्वाला सुरूवात पण असेल म्हणजेच हे विश्व निर्माण करावे लागेल;

म्हणजेच या विश्वाचा निमार्णकर्ता ईश्वर या विश्वाच्या बाहेर असला पाहिजे. मी मगाशी सांगितल्याप्रमाणे मला हे तर्कशुद्ध वाटत नाही. अतार्किक वाटते.

स्पिरीट हा मॅटरच्या विरळ अवस्थेचा सर्वोच्च बिंदू आहे जेथून अजून विरळीकरण शक्य नाही. ही sublimate स्थिती आहे म्हणजेच येथून पुढे विरळीकरणाचा प्रयत्न केल्यास ते मॅटर परत उलटा प्रवास सुरू करते. अर्थात स्पिरीटची स्थिती आपल्या मर्यादित इंद्रियांना आकलन होऊ शकत नाही. स्पिरीट ही कितीही उच्चावस्था असली तरी ते मॅटरच आहे. त्याचे घनीकरण शक्य आहे. मी माझ्या मर्यादित इंद्रियसाधनांनी मॅटर आणि स्पिरीटमध्ये विभागणी रेषा काढू शकत नाही. मी अपूर्ण मर्यादित असल्याने ही टप्प्याटप्प्याने विरळीकरणाची अमर्याद प्रक्रिया मला अशक्य म्हणून सोडून द्यावी लागते.

या सगळ्याचा मतितार्थ असा की, **अस्तित्व हे एकमेवद्वितीय, शाश्वत, अमर्याद असे आहे.** त्याला तुम्ही मॅटर म्हणा अथवा स्पिरीट म्हणा. मी सध्या ज्या स्तरावर आहे ते पाहता या अस्तित्वाला मॅटर म्हणणे मला जास्त संयुक्तिक वाटते. आपण मॅटरलाच 'माया' म्हणतो. काही जण म्हणतात की या मॅटरला आकार, रूप आहे. जी तात्पुरती आहे ती म्हणजे 'माया'. मला आणि प्रत्येक समंजस, रॅशनल अध्यात्मशास्त्राला मायेची अशी व्याख्या मान्य नाही. आमच्या मते जे काही आहे ते फक्त अस्तित्व आहे आणि त्याला माया म्हटले जाते कारण ते स्थिर नाही. त्यात स्थित्यंतरे होतात. स्थित्यंतराची ही प्रक्रिया अखंड चालू असते. एकच अमर्याद वस्तूसंचय आहे ज्यात काही स्थितीत तो जास्त घन तर काही स्थितीत तो जास्त विरळ असतो. हे चक्र अव्याहतपणे अखंड चालू असते. (centripetal and centrifugal) केंद्रगामी आणि केंद्रत्यागी प्रक्रियेने सर्वकाही या वर्तुळाच्या मर्यादेतच रहाते. काहीही परिघाच्या बाहेर जात नाही. **फॉर्म बदलत राहतात पण आतील अस्तित्व तेच रहाते. आता तू प्रश्न विचारशील की निसर्गाची स्वतःची अशी प्रक्रिया आहे तर आपण चांगले अथवा वाईट असण्याला काय अर्थ राहिला?** आपले जीवात्मे या प्रक्रियेमध्ये योग्य वेळी etherealise होतीलच की, Spiritualise होतीलच की! आता प्रश्न हा आहे की जीवात्मा (soul) काय आहे? material की immaterial? Matter की Spirit? मगाशी सांगितल्याप्रमाणे माझ्या मते सोल हा मॅटरच आहे कारण मॅटरशिवाय काहीच नसते. मग सोल म्हणजे नक्की काय? **सोल किंवा जीवात्मा हा अशा गुणधर्मांचा संचय आहे ज्यायोगे 'मी आहे' ही जाणीव**

**मला होते.** विचार हे मॅटर आहे. प्रत्येक गुणविशेषणात मॅटर आहे.

आपला जीवात्मा कधी ना कधी Spiritualise होईलच! याबाबत आणखी समजून घेण्यासाठी परत एकदा बर्फाचे उदाहरण घेऊ या. उष्णतेचा संपर्क आला की बर्फाचे पाणी होते. बर्फ असताना सर्व केंद्रगामी बल इतके प्रबळ असते की त्यामुळे बर्फातील मॅटर एकत्र रहाते. बर्फाचे विरळीकरण होण्यासाठी केंद्रत्यागी बलाची आवश्यकता असते जे बल उष्णतेच्या रूपात मिळते. जर मुद्दाम उष्णता पुरवली नाही तर बर्फ बर्फच राहील. जेव्हा कधी सूर्याचे किरण बर्फावर काही कारणाने पडतील तेव्हा बर्फाचे विरळीकरण होईल.

माणसाचे तसेच आहे. केंद्रगामी बले कार्यरत असल्यामुळे माणसाचे विविध देह बनतात आणि ते तसेच रहातात. जर माणसाला त्याचे सूक्ष्मीकरण करायचे असेल (ज्याला सामान्यतः आपण उर्ध्वगामी मार्ग किंवा उत्क्रांती असे म्हणतो) तर त्याला केंद्रत्यागी बलाची आवश्यकता असते. असे बल म्हणजे त्याची इच्छाशक्ती. (Will or Will Power) **माणसाच्या इच्छाशक्तीचा वापर हे अध्यात्माचे, गूढशास्त्राचे पहिले तत्त्व आहे.** जीवात्म्याचे सूक्ष्मीकरण हा परिणाम आहे आणि इच्छाशक्तीचा वापर हे त्याचे कारण आहे. प्रत्येक अस्तित्वाचे अस्तित्व किंवा कार्य हे केंद्रगामी पद्धतीने चालते याचे कारण म्हणजे कार्यकारण नियम (Law of Cause & Effect). या नियमाच्या बाहेर काहीही नाही. **प्रत्येक गोष्ट एकाच वेळी कशाचे तरी कारण असते आणि कशाचा तरी परिणाम असते.** उष्णतेचेच उदाहरण घे. उष्णता ही दुसऱ्या कोणत्या तरी बलाचा परिणाम आहे आणि बर्फ वितळण्यासाठी उष्णता हे कारण आहे. शून्यातून अचानक काहीही निर्माण होत नसते.

मानवाने स्वतःचे सूक्ष्मीकरण कसे करायचे? तर कार्यकारणभाव नियमाचा अभ्यास करून, तो समजून घेऊन, त्याप्रमाणे आपली कृती करून – म्हणजेच निसर्गातील विविध शक्तींचे ज्ञान मिळवून. गूढशास्त्राचा किंवा अध्यात्माचा उपयोग न करताही माणूस उत्क्रांतीच्या पायऱ्या चढू शकणार नाही का? तर मी ठामपणे सांगतो की हो चढू शकेल पण अध्यात्माचा वापर करून जो उन्नतीचा वेग ठेवणे शक्य आहे तो वेग अध्यात्माचा उपयोग न करता शक्य नाही. **मानवाने उत्क्रांतीचा सोपान चढण्याची इच्छा धरणे हे अध्यात्मातले फक्त पहिले पाऊल आहे.** हे एक पाऊल टाकल्याने थोडी प्रगती नक्कीच होईल पण ती पुरेशी नसेल. माणूस ज्या प्रमाणात कारण निर्माण करील त्या प्रमाणात

माणसाला परिणाम मिळतील.

माणूस प्रत्येक क्षणाला मॅटरचे अणू आसमंतात सोडत असतो आणि आसमंतातून घेत असतो. ही अव्याहत प्रक्रिया आहे. जी व्यक्ती अध्यात्माचा निश्चित असा वापर करत नाही त्या व्यक्तीच्या अनेकविध संमिश्र इच्छा आकांक्षा असतात आणि नकळतपणे, अजाणतेपणे तो अनेक कारणे निर्माण करत असतो ज्यामुळे आसमंतातून अनेक अणू, बल त्याच्याकडे आकृष्ट होते आणि यातला अनेक भाग त्याच्या उच्च प्रगतीला सुयोग्य नसतो किंबहुना अडथळा ठरतो. याचप्रकारे माणूस जेव्हा बल किंवा अणू आसमंतात प्रसूत करतो तेव्हा निर्माण केलेल्या कारणानुसार मारक आणि तारक बलांचे मिश्रण असलेले बल आसमंतात जाते आणि ते संपर्कात येणाऱ्या व्यक्तींच्या प्रगतीत अडथळा ठरू शकतो.

जी व्यक्ती अध्यात्मिक असते तिचे आत येणाऱ्या आणि बाहेर जाणाऱ्या दोन्ही बलप्रवाहांवर नियंत्रण असते. ती परिस्थितीचा मालक असते. He is the Master of the Situation. अशी व्यक्ती निसर्गाच्या विविध बलांबरोबर आंधळेपणाने वहात न जाता या बलप्रवाहांना ती मार्ग दाखवते. असे प्रवाह नियंत्रित करते. निसर्गनियमांचे, नैसर्गिक शक्तींचे योग्य आकलन झाल्यामुळे व समजल्यामुळे अशी अध्यात्मिक व्यक्ती निर्वाण अवस्थेला जाण्यासाठी सुयोग्य, पूरक आणि पोषक असेल अशी परिस्थिती निर्माण करू शकते.

'निर्वाण' म्हणजे काय? **निर्वाण हे कोणतेही, कुठेतरी असलेले स्थान नाही तर ती एक अवस्था आहे.** निर्वाण ही अशी अवस्था आहे ज्यात माणसाचे किंवा त्याच्या जीवात्म्याचे इतके सूक्ष्मीकरण होते की तो एकमेवद्वितीय, अमर्याद अस्तित्वाचा एखादा हिस्सा न रहाता स्वतः एकूणात विलिन होतो. तो स्वतःच संपूर्ण (Whole) बनतो. ज्याने उत्कांतीची फक्त इच्छा धरली आहे त्यापेक्षा प्रगत अध्यात्मी जास्त सक्षम व वरच्या दर्जाचा असतो याचे आणखी एक कारण म्हणजे माणूस निसर्गनियमांचे, निसर्गाच्या शक्तींचे जेवढे जास्त अध्ययन करतो; त्या जितक्या जास्त समजून घेऊन त्याप्रमाणे स्वतःचे आचरण ठेवतो तेवढा जास्त तो मानवसमूहासाठी उपयुक्त ठरतो. बहुतेक जण सुरवातीच्या टप्प्यांवर स्वतःच्या प्रगतीवर संतुष्ट, समाधानी असतात परंतु जो जास्त उन्नत आहे त्याला स्वतःच्या प्रगतीपेक्षा मानवसमूहाचे भले होण्याने जास्त आनंद होतो व त्यामुळे त्याचा प्रत्यक्ष मदत व फायदा मानवसमूहाला होतो.

जर हे विश्व उत्क्रांत होत आहे, जास्त जास्त सूक्ष्माकडे जात आहे तर या सूक्ष्मीकरणाच्या प्रवासात अशी एक स्थिती येईल जी सूक्ष्मीकरणाचा सर्वोच्च बिंदू असेल आणि येथे सूक्ष्मीकरण थांबेल. तेव्हा सर्व काही निर्वाण अवस्थेतच असेल आणि येथून पुन्हा घनीकरणाची (involution) प्रक्रिया सुरू होईल. मग आता तुला असा प्रश्न पडेल की जर निर्वाणात कधी ना कधी तरी पोचायचेच आहे तर अध्यात्माचा अभ्यास करण्याचे, त्याप्रमाणे आचरण ठेवण्याचे वेगळे कष्ट का घ्यायचे?

असे वेगळे कष्ट घेण्याची दोन कारणे आहेत. पहिले कारण म्हणजे हा सूक्ष्मीकरणाचा सर्वोच्च बिंदू केव्हा येईल व पुढच्या चक्रातील घनीकरणाची प्रक्रिया केव्हा सुरू होईल हे आपणास माहित नाही. त्यासाठी कितीतरी दशलक्ष वर्षाचा कालावधी जावा लागेल. या प्रदीर्घ कालावधीत माणसामध्ये कितीतरी बदल, रूपांतर होईल. मॅटर हे कधीच स्थिर नसते. ते सतत बदलत असते. Practical Occultist तुलनेने निर्वाणाच्या स्थितीत खूप कमी कालावधीत पोचतो. इतर सर्वांसाठी हा कालावधी मोठा, अमर्याद आहे. जे अमर्याद आहे ते साध्य करणे मर्यादेला शक्य नाही. दुसरे महत्वाचे कारण म्हणजे जेव्हा सर्व काही निर्वाणात विलीन होईल तेव्हा ''मी निर्वाण अवस्थेत गेलो'' याला काही अर्थ रहाणार नाही. वेगळे असे काही 'मी' निर्वाण गाठू शकणार नाही.

मी या जन्मात दामोदर आहे. पुढच्या जन्मात आणखी कोणी. माझा देहात्मा (Personality) या जन्मानंतर नष्ट होणार आहे. दामोदर नष्ट होणार आहे. पुढच्या जन्मी नवा देहात्मा असणार आहे. माझा जीवात्मा (Individuality) हा प्रत्येक जन्मात वेगवेगळा नसतो. तो प्रत्येक जन्मानंतर नाश पावत नाही तर तो जन्म-मृत्युच्या चक्रात टिकून रहातो. माझ्या जीवात्म्याचे हे वेगळे अस्तित्व माझ्या जीवात्म्याने निर्वाण प्राप्त करेपर्यंत वेगळे राखणे आवश्यक आहे. ही सगळी प्रक्रिया अध्यात्मशास्त्रात सांगितली, शिकवली जाते.

मी काही शून्यातून nothing मधून तयार झालेलो नाही. ज्या कणांनी मी बनलो ते कण आधीपासूनच अस्तित्वात आहेत पण मला माहित नाही की ते आधी कोणत्या रूपात आणि कोठे अस्तित्वात होते. ह्या कणांची आधी लक्ष, दशलक्ष रूपांतरणे झाली असतील पण हे सर्व दामोदरला माहित नाही कारण

दामोदर किंवा माझा देहात्मा प्रदीर्घ जन्मसाखळीत राखून ठेवलेला नाही. माझ्या देहात्म्याचे विघटन थांबेल असे बल मी वापरले नाही. हे कसे करायचे याची किल्ली अध्यात्मशास्त्र देते. जर अध्यात्माशास्त्राच्या सूत्रांप्रमाणे मी कृत्या केल्या तर मी निर्वाणाला पोहोचेन.

मी जरी निर्वाणात पोचलो तरी ती विलिनीकरणाची अवस्था शाश्वत नसते. त्या अवस्थेत मी कायम रहात नाही. निर्वाण हे शाश्वत, सुसंगत नाही. काही वर्षांच्या किंवा काही जन्मांच्या (जे मर्यादित आहेत) कृतींमुळे मला अमर्याद बक्षीस किंवा शिक्षा मिळेल हे शक्य नाही. दशलक्ष वर्षेसुद्धा शाश्वतापुढे, अमर्याद कालावधीपुढे काहीच नाहीत. कोणत्याही मर्यादितचे फळ अमर्याद मिळणे हे न्याय्य, उचित नाही.

आता तू विचारशील की निर्वाणावस्थेस जाऊन जर परत यायचे असेल तर निर्वाण प्राप्त करण्याचा उपयोग तरी काय? याची पुन्हा दोन कारणे आहेत. पहिले म्हणजे मी निर्वाणात काही काळ असेन. कोणताही परिणाम हा कारणांच्या प्रमाणात असतो. मी वापरलेल्या बलांचा परिणाम जोपर्यंत कार्यरत आहे तोपर्यंत मी निर्वाणात असेन. निर्वाणात पोचण्यासाठी मी केलेल्या प्रयत्नांचे परिणाम पूर्ण होईपर्यंत मी निर्वाणात असेन नंतर नाही. आता तू विचारशील की ही कारणे तयार करण्याची आणि त्याचा परिणामस्वरूप निर्वाणावस्था ही प्रक्रिया मी अनंत काळासाठी ad infinitum करू शकतो का? तर उत्तर आहे की हे शक्य नाही. कारण Law of Exhaustion सदैव कार्यरत असतो. आपण विशिष्ट परिणाम साध्य करण्यासाठी काही उर्जा खर्च करतो. जेव्हा दुसरे काही तरी कमी होते (detriment), खर्च होते, तेव्हाच तुझ्याकडून काहीतरी कृती होते.

दुसरे कारण असे आहे की जेव्हा तू या सूक्ष्मीकरणाच्या प्रक्रियेतून जात असतोस तेव्हा तू ज्या कणांचा बनला आहेस त्या कणांमध्ये काही विशिष्ट, निश्चित प्रवृत्ती तयार होतात. या विश्वात जी एका पाठोपाठ सायकल्स् येत असतात त्या सर्व चक्रात कणांच्या अशा तयार झालेल्या प्रवृत्ती परत परत व्यक्त, दृगोचर होत रहातात. सोप्या भाषेत सांगायचे तर रूपांतरणाच्या या चक्रात, पुर्नजन्माच्या साखळीत एक पोषक, पूरक स्थिती तयार होते जी तुला निर्वाणावस्थेस लवकर पोचण्यासाठी सहाय्यकारी ठरते. यामुळे तू थोडा जास्त काळ निर्वाणावस्थेत राहू शकतोस. तुलनेने तू थोडा जास्त मुक्त असतोस.

माणसाची जाणीव पूर्ण विकसित झाल्यानंतर जर जीवात्म्याने ती निर्वाणाला पोचेपर्यंत पावित्र्याने अबाधित राखली नाही तर त्या जाणिवेचे पूर्ण विकासाच्या अवस्थेतून विघटन हे होणारच. मी हे मानतो की दामोदर म्हणून माझ्या जाणीवेचा पूर्ण विकास हा या पृथ्वीवरच शक्य आहे. जर मी त्याआधीच मृत्यू पावलो तर माझ्या जीवात्म्याला पृथ्वीवर परत जन्म घेणे क्रमप्राप्त आहे.

तुला आत्तापर्यंत सांगितलेली पुर्नजन्माबाबतची माहिती तुझ्यासाठी पुरेशी आहे. या सर्व संकल्पना कागदावर उतरवणे खूप अवघड आहे कारण ही प्रक्रिया क्लिष्ट आहे. अशा गोष्टी आणि संकल्पना अंतःप्रज्ञेनेच जाणून घ्यायच्या असतात. या सर्व संकल्पना दुसऱ्याला सांगण्यासाठी प्रथम माझ्या अमूर्त विचारांना मूर्त रूप द्यावे लागते. ते क्रमवार, मुद्देसूद मांडावे लागते आणि मगच ते लिहून काढता येते त्यामुळे या संकल्पनांवर लिहिण्यापेक्षा किंवा बोलण्यापेक्षा समोरासमोर चर्चा करणे मला जास्त सोपे वाटते. तुला हे सर्व लिहिताना अनेक मुद्दे माझ्याकडून सुटले असतील पण मी तुला मुख्य संकल्पना दिल्या आहेत. यावर तू प्रश्न विचारू शकतोस आणि त्याची उत्तरे द्यायला मला नक्कीच आवडेल. यात ज्या काही त्रुटी आहेत त्याला फक्त मीच सर्वस्वी जबाबदार आहे. मी फक्त Isis Unveiled वाचले आहे. एच्.पी.बीं.ना बोलताना बरेच वेळा ऐकले आहे आणि काही प्रसंगी उच्च शक्तींकडून, दिक्षितांकडून काही सूचना, निर्देश मिळाले आहेत; पण पुढची समजून घेण्याची प्रक्रिया व प्रयत्न माझेच आहेत. जर हे सर्व तुला योग्य आणि बरोबर वाटले तर त्याचे सर्व श्रेय एच्.पी.बी. आणि आपले ज्येष्ठ बंधूंना जाते. उलट जर काही चुका असतील तर नीट समजून न घेण्याचा पूर्ण दोष माझा आहे आणि यातून हेच निदर्शनास येईल की मी अंतःप्रज्ञेच्या क्षेत्रात खूप मागे आहे.

(क्रमशः)

# महात्म्यांचे बोल

1. As for human nature in general, it is the same now as it was, a million of years ago. Prejudice based upon selfishness. a general unwillingness to give up an established order of things for new modes of life and thought - and occult study requires all that and much more - pride and stuborn resistance to Truth if it but upset their previous notions of things, such are the characteristics of your age and especially of the middle and lower classes.

2. In common with many, you blame us for our great secrecy. Yet we know something of human nature, for the experience of long centuries - aye, ages - has taught us .... so long as science has anything to learn and a shadow of religious dogmatism lingers in the hearts of the multitudes, the world's prejudices have to be conquered step by step, not as a rush.

3. The mysteries never were, never can be, put within the reach of the general public, not, at least, until that longed for day when our religious philosophy becomes universal.

4. The adept is the rare efflorescence of a generation of enquirers; and to become one, he must obey the inward impulse of his soul irrespective of the predential considerations of worldly science and sagacity.

# लॉज वार्ता

**मार्च व एप्रिल २०२० मधील म.थि.फे. स्तरावरच्या कोणत्याही सभा, चर्चासत्रे, कार्यशाळा किंवा इतर कोणतेही कार्यक्रम कोवेड–१९ च्या प्रादुर्भावामुळे झाले नाहीत. तसेच भोवाली येथे यावर्षी होणारी सर्व चर्चासत्रे, कार्यशाळा व बैठका रद्द करण्यात आल्या आहेत.**

◆ **म.थि.फे. कार्यकर्ता वृत्तांत –**

१) पूना लॉज येथे गेल्या सुमारे १५ वर्षांपासून दर रविवारी हिलिंग रिच्युअल – व्याधी निवारण विधी घेण्यात येतो. **बंधु पालकृत** – सचिव, म.थि.फे. यांनी ४ एप्रिलला सर्व सदस्यांना आवाहन केले की कोवेड–१९ च्या बाधितांना आणि एकंदरच सर्वांचे आरोग्य उत्तम रहाण्यास मदत व्हावी म्हणून **प्रत्येकाने आपल्या आपल्या घरी सुरक्षित अंतर पाळून घरच्यासमवेत हा विधी दररोज सकाळी ९ वाजता करावा.** सर्वांनी एकाच वेळेस हा विधी केल्याने प्रत्येकाला लाभ होईलच पण समाजासाठीही त्याचा चांगला एकत्रित परिणाम होईल. त्यांनी विधी कसा करावा याचे काही फोटोही सर्वांना मोबाईलवर पाठवले.

◆ **दी अकोला थिऑसॉफिकल लॉज, अकोला –**

जागतिक महिला दिनानिमित्त अकोला लॉजतर्फे रविवार दि. ८ मार्च २०२० रोजी **सर्व धर्म महिला मेळावा** आयोजित करण्यात आला. डॉ. अर्जित शेख – मुस्लिम, भगिनी सुजाता साळवे – ख्रिश्चन, डॉ. पूनम मानकर – हिंदी, ॲड. सौ. वालचळे – जैन आणि इतर अनेक महिला या मेळाव्यात सहभागी झाल्या होत्या.

◆ **दी पूना लॉज, पुणे –**

१) पूना लॉजमध्ये १५ मार्च २०२० पर्यंतचे रविवारचे कार्यक्रम नेहमीप्रमाणे संपन्न झाले. मंगळवार दि. १७ मार्च २०२० रोजी साप्ताहिक अभ्यास वर्ग नेहमीप्रमाणे झाला. कोवेड–१९ च्या प्रादुर्भावामुळे त्यानंतर आजपर्यंत पूना लॉजमधे कोणतेही कार्यक्रम झाले नाहीत. **याला अपवाद भारत समाज पूजेचा.** लॉजमधे १९२८ पासून नेमाने दर रविवारी भारत समाज पूजा न चुकता घेण्यात येते. भगिनी सुमती कुलकर्णी यांनी अध्यक्षांना सुचवले की जरी इतर कार्यक्रम

होऊ शकत नसले तरी कोणी दोघांनी येऊन ही पूजा दर रविवारी करावी. त्यांनीही यात सहभागी रहाण्याची इच्छा दाखवली. **२२ मार्चच्या रविवार पासून सध्या बंधु कौस्तुभ भडभडे आणि बंधु दुष्यंत वैद्य सकाळी ९.३० ला ही पूजा करत आहेत.** लॉजच्या पदाधिकाऱ्यांतर्फे या दोघांचे मनःपूर्वक आभार.

२) शनिवार ७ मार्च २०२० रोजी दुपारी ३ ते ६ असे **आरोग्य शिबिर** महिला दिनानिमित्त घेण्यात आले. पूना लॉजच्या होमिओपॅथी क्लिनिकच्या वतीने डॉ. सौ. हळबे यांनी हे शिबिर घेतले.

३) कोवेड-१९ च्या पार्श्वभूमीवर पूना लॉजच्या मार्च आणि एप्रिल महिन्याच्या 'मासिक कार्यकारिणी सभा' होऊ शकल्या नाहीत.

★★★

## विनम्र श्रद्धांजली

**१) मेरी अँडरसन –** थिऑसॉफिकल सोसायटीच्या आंतरराष्ट्रीय उपाध्यक्षा (१९९५ ते २००१) मेरी अँडरसन यांचे दि. १४ एप्रिल २०२० रोजी इंग्लंडमध्ये दुःखद निधन झाले. गेली ५० वर्षे त्या थिऑसॉफिकल सोसायटीच्या सदस्या होत्या. अनेक वर्षे युरोपियन फेडरेशनच्या त्या सचिव होत्या. थिआसॉफीच्या कार्याचा प्रसार त्यांनी आंतरराष्ट्रीय समुदायामध्ये केला. मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनतर्फे त्यांना विनम्र अभिवादन.

**२) स्वामी आनंद ऋषी –** दि. ३० मार्च २०२० ठाणे थिऑसॉफी लॉजचे ज्येष्ठ व सक्रीय सदस्य आणि माजी सजिव बंधू केशव हरी खरे उपाख्य स्वामी आनंद ऋषी ह्यांचे वयाच्या ९१ वर्षी दुःखद निधन झाले. स्वामीज सन १९६३ पासून थिऑसॉफीचे सदस्य व गाढे अभ्यासक होते. ठाणे आणि डोंबिवली परिसरात त्यांनी अनेक थिऑसॉफीचे सभासद केले. त्यांच्या कन्या सौ. संजीवनी जोहरी ह्या ठाणे लॉजच्या कोषाध्यक्ष आहेत. अध्यात्मिक विषयांवर स्वामीजींनी २० पुस्तके लिहिली असून इतर विविध विषयांवरही लिखाण प्रसिद्ध झाले आहे. पतंजली योगसूत्र, पुनर्जन्म, ध्यान, अष्टावक्र गीता ह्या विषयांवरील त्यांची पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. आपला मृत्यू आपण ध्यानामध्ये किंवा योगामध्ये असताना यावा ही त्यांची इच्छा पूर्ण झाली असे त्यांच्या कन्या डॉ. मंजिरी दामले व नुपूर खरे ह्यांनी कळविले आहे. ठाणे लॉजचे ज्येष्ठ सदस्य श्री चंद्रकांत भिसे यांनी स्वामीजींना आदरांजली वाहिली आहे. म.थि.फे. तर्फे स्वामी आनंदऋषींना विनम्र श्रद्धांजली.

# दी थिऑसॉफिकल सोसायटी

मुख्य कार्यालय : अड्यार (चेन्नई) ६०० ०२०.
e-mail : secy.hq@ts-adyar.org
website : www.ts-adyar.org

**आंतरराष्ट्रीय अध्यक्ष** : बंधु टीम बॉईड, अड्यार, चेन्नई.

**भारतीय शाखा**

**कार्यालय** : थिऑसॉफिकल सोसायटी, कामाच्छा, वाराणसी – २२१ ०१०.
फोन : (०५४२) २४५०७७६, २४००७७३
e-mail : theosophyvns@gmail.co
website : www.theosophy-india.org

**महासचिव** : श्री. प्रदिप गोहील **कोषाध्यक्ष** : बंधु व्ही. नारायणन

**मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनची कार्यकारिणी**

**अध्यक्ष** : ॲड. संजय दि. पोटे
२, चिंतामणी अपार्टमेंटस्, प्लॉट नं ७२, उजवी भुसारी कॉलनी,
कोथरूड, पुणे ४११०३८. मोबाईल नं. : ७७४४९१०७८७

**उपाध्यक्ष** : बंधु प्रा. आर. सी. माळी
सांगली ४११००४. मो. नं. : ९९२२२३१७८८

**सचिव** : बंधु अरूण मा. पालकृत
इंद्रप्रस्थ, ए१/११, साई चौकाजवळ, न्यू सांगवी, पुणे ४११०६१.
फोन : ९४२२०३६७०२

**कोषाध्यक्ष** : बंधु कौस्तुभ भडभडे
पुणे ४११००४. मो. नं.: ९६२३४४८२४३

**उपसचिव** : भगिनी प्रवीणा शाह, खामगाव.

**कार्यकारिणी सदस्य** : बंधु जे. के. जाधव बेळगाव, बंधु डी. एस. कारखानीस सांगली, बंधु ए. पी. लोखंडे नागपूर, बंधु एस. के. विसाळ मालेगाव, भगिनी एस. एन. मेहेत्रे नागपूर, बंधु ॲड. एन. डी. राऊत अमरावती, बंधु डॉ. ए. एस. सोनोने अकोला, बंधु एन. एन. राऊत अकोला, बंधु प्रा. एन. डी. अभ्यंकर पुणे (आमंत्रित), बंधु प्रा. सी. ए. शिंदे अड्यार, चेन्नई (इंडियन कॉन्सिल रिप्रेझेंटेटिव्ह.)

**विश्वबंधुत्व संपादक मंडळ** : बंधु नितीन अभ्यंकर, बंधु शशांक बुरसे,
बंधु ए. एस. सोनोने, भगिनी नीला अभ्यंकर.

**फेडरेशन कार्यालय : मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन**

द्वारा : पूना लॉज, ९१८ शिवाजीनगर, गणेशवाडी, बी.एम्.सी.सी.रोड, पुणे ४११ ००४.
फोन : ०२०-२५६७०४१८

# थिऑसॉफिकल सोसायटी

## तीन उद्दिष्टे

१. जात, धर्म, लिंग व वर्ण हे भेद न करता मानवजातीच्या विश्वबंधुत्वाचे जिवंत केंद्र बनविणे.

२. तौलनिक धर्म, तत्वज्ञान, विज्ञान यांच्या अध्ययनास उत्तेजन देणे.

३. अनाकलनीय सृष्टिनियम व मानवातील सुप्त शक्तींचे संशोधन करणे.

## तीन महान सत्ये

१. माणसाचा आत्मा अमर आहे, त्याच्या विकासाला आणि वैभवाला सीमा नाही.

२. जे तत्व जीवन देते, ते आपल्या आत तसेच बाहेरही वास करते. ते अमर व सदा कल्याणकारी आहे. ते ना ऐकू येते, ना दिसते, ना हुंगता येते; पण ते जाणण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या मनुष्याला अनुभवगम्य आहे.

३. प्रत्येक माणूस स्वत:च स्वत:चा एकमेव शास्ता आहे. स्वत:ला प्रकाशात किंवा अंध:कारात ठेवणारा तोच, जीवन, पुरस्कार, शिक्षा हे त्याचे हुकुम.

## विचार स्वातंत्र्य

थिऑसॉफिकल सोसायटी जगात दूरदूर फोफावली आहे. सर्व धर्मांचे अनुयायी, आपआपले धार्मिक सिद्धांत, शिकवण व श्रद्धा यांचा त्याग न करता सोसायटीचे सभासद झाले आहे व होत आहेत. म्हणून आता हितावह (desirable) हे आहे की सर्वांना हे पक्के माहित असायला हवे की असे कोणतेही सत्य वा सिद्धांत किंवा मत नाही, मग ते कोणीही सांगितलेले अथवा शिकवलेले असो; जे सोसायटीच्या कोणत्याही सभासदावर बंधनकारक असू शकेल. सोसायटीच्या सभासदाने ते मान्य करावे किंवा नाही याचे त्याला पूर्ण स्वातंत्र्य आहे. कोणाही टीचरला किंवा लेखकाला एच्. पी. ब्लॅव्हॅटस्की बाईंपासून ते आजपर्यंत आपले मत व उपदेश, शिकवण सभासदावर लादण्याचा अधिकार नाही. कोणत्याही विचार प्रवाहाबरोबर जाण्याचा, विचार-पंथाचा स्वीकार करण्याचा हक्क त्याला आहे, पण त्याचबरोबर आपली पसंती इतरांवर त्याला लादता येणार नाही. सभासदाचा त्याच्या वैयक्तिक मतामुळे मतदानाचा हक्क आणि निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून उभे राहण्याचा हक्क काढून घेता येणार नाही. मते अथवा श्रद्धा यांमुळे काही विशेष अधिकार मिळणार नाही किंवा शिक्षाही होणार नाही. थिऑसॉफिकल सोसायटीच्या सर्व सभासदांना जनरल कौन्सिलची कळकळीची विनंती आहे की, त्यांनी सोसायटीच्या या मूलभूत तत्वांचा आदर करून त्यांना अबाधित राखावे, त्यांचे संरक्षण करावे व त्याबरहुकुम आचरण करावे, सौजन्य बाळगून व इतरांची कदर करून निर्भयपणे मतप्रदर्शन व प्रगटीकरणाचा हक्क गाजवावा.

---

**संपर्क : 'विश्वबंधुत्व' – मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन**

९१८, शिवाजीनगर, गणेशवाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४.

दूरध्वनी:(०२०) ५६७०४१८

**Periodical Vishva Bandhutva**

**Reg. No. MAHMAR / 2003 / 7740**

# Printed Books

To,

From :

**Secretary,**
Marathi Theosophical Federation
C/O - The Poona Lodge, Theosophical Society
918, Shivajinagar, Ganeshwadi,
Deccan Gymkhana, Pune 411004.